# विचार - मंथन


## एस.डी. कोंडोलीकर

**स्वा. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालय, कारंजा (लाड) जि. वाशिम**

**dkondolikar@gmail.com**


## सारांश


*" चिन्तनीय हि विपदाम् आदौ एव प्रतिक्रिया ।*
*न कूपखननम् युक्तम् प्रदीप्ते वन्हिना गृहे ।।"*

*वर्तमानात घडणाऱ्या सर्व घटना निश्चित माणूसकीला कलंक लावणाऱ्या घटना आहेत. त्या सर्वांवर विजय मिळविणे ही फार दूरची गोष्ट आहे. पण त्यासाठी काळजी घेणे व पूर्व नियोजन करणे. वेळ प्रसंगी कठोर पाऊल उचलणे ह्या सर्वांची आज नितांत गरज आहे. माणसातील माणूसकीला स्मरून, स्वार्थ बाजूला ठेवून राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य देणे.*

*निसर्गाचे संगोपन व संवर्धन ही प्राथमिक बाब. निसर्गातील घडमोडी तर घडणारच आहे.त्याच्या विरोधात जाता येत नाही. ह्या घटनांना सामोरे जाण्या साठी पूर्व नियोजन म्हणून आपत्ती व्यवस्थापनाला पण तेवढेच महत्व द्यावयास हवे.*


## प्रस्तावना

एकविसावं शतक, संगणक युग ! गाव गावाशी जोडलं गेलं,शहर शहराशी जोडलं गेलं, देश देशाशी जोडला गेला, जग लहान झालं,माणूस मोठा झाला. भौतिकदृष्ट्या सुखसंपन्नतेचा माणसाने उच्चांक गाठला, पण माणूस माणसापासून दुर जात गेला. माणसानं निसर्गातील प्रत्येक शूत्रवर विजय मिळवला, पण आज माणूसच माणसाचा सर्वात मोठा शत्रू बनला आहे, माणसाला जगात आता कसलीही - कुठलीही भीती वाटत नाही. माणसाला आता भीती वाटते ती फक्त माणसाचीच. कारण खोट बोलून फसवितो तो माणूसच. जवळच्यांना धोका देतो, विश्वासघात करतो तो माणूसच, बॉम्बस्फोट करतो, आगी लावतो, दंगल घडवतो तो पण माणूसच. चांगले शोध लावतो तो पण माणूसच आणि त्याचे विध्वंसक उपयोग करतो तो पण माणूसच.

आदिमानवाला आधूनिक मानव बनवतो तो पण माणूसच आणि माणसातील हैवान जागा होवू स्त्री भ्रुण हत्या, बालिकांपासून आजी पर्यंत कोणताही विचार न करता बलात्कार व त्यानंतर हत्या, ॲसिड फेकणे ह्या सारख्या हिंसाचार करणारा ही माणूसच! सख्या आई-वडिलांशी भावांशी-बहिणीशी - मित्राशी नातं तोडतो तो पण माणूसच! स्वार्था पोटी निसर्गाचा गळा आवळणाराही माणूसच.निसर्ग कोपला की. त्यांत बळी पडणाराही माणूसच. लुटालुटकरणाराही माणूसच. एकाच माणसाच्या किती जाती? किती प्रकार? हाच माणूस अतिशय सामान्यपणे आपल्या साध्या सरळ जीवंनात आनंदासाठी धडपडत असतो. आपले जीवन नाद, मधूर व सुरेल संगीताच्या झंकाराने भरून जावे, प्रपंचात नित्य दिवळीचा आनंद ओसंडून जावा, आपला परमार्थ परिपूर्ण व्हावा व एक कृतार्थ धन्य जीवनाचा अनुभव आपणास यावा, असे कोणास वाटत नाही.

प्रत्येक मनुष्य ह्या सुखाच्या धडपडीत संपूर्ण आयुष्यात कोणाला ना कोणाला आपले आदर्श मानत असतो. त्या करिताच प्रत्येक मनुष्याला मनापासून असे वाटत असते की, भगवंताने आपले सर्व संकल्प व मनोरथ पूर्ण

करावेत. श्री ज्ञानेश्वर माऊली सुध्दा देवाजवळ मागणे मागतात की,"जो जे वांछील तो ते लाहो प्राणीजात" वास्तविक आपण देवाजवळ लडीवाळपणे मागायचे व देवाने आपल्या मनोकामना पूर्ण करायच्या अशी व्यवस्था निसर्गाने-ईश्वराने आपल्या जीवनातच करुन ठेविली आहे. निसर्गाने अशी सुरेख व्यवस्था करुन सुध्दा आज आपली अवस्था मात्र केविलवाणी झाली आहे, याचे एकमेव कारण हे की, माणसाला याची मुळीसुध्दा जाणवी नाही.

आपण आवडी प्रमाणे स्वत:च्या वर्णानुसार समाजासेवेचे कर्म उचलेले, त्यात हृदयाची भक्ती ओतली, जिव्हाळा ओतला. तरी एवढयाने भागत नाही त्या कर्मात ज्ञान असल्याशिवाय त्या कर्माला पूर्णता येणार नाही. कर्मात ज्ञान व भक्ती यांचा समन्वय पाहिजे.

ज्ञान दोन प्रकारचे आहे. एक आध्यात्मिक ज्ञान व दुसरे विज्ञान. कर्म चांगले व्हावयास या दोन्ही हातांची आवश्यकता आहे. आध्यात्मिक ज्ञान म्हणजे अद्वैत, सारी मानवाजात माझी आहे, हे सर्व माझेच भाऊ आणि यांची सेवा करावयासाठी मला विज्ञान पाहिजे आहे. अशीच जी दृष्टी ती ज्ञानविज्ञानात्मक दृष्टी.

ही दृष्टी जोपर्यंत नाही. तो पर्यंत विज्ञान सुरक्षित नाही. विज्ञानाच्या पाठीमागे हे अद्वैताचे तत्वज्ञान, हे प्रेमाचे तत्वज्ञान जर नसेल, तर विज्ञान सर्व जगाची होळी करील. विज्ञानाने संसार सुंदर होण्याऐवजी भयाण होईल.

काळया ढगांनी भरलेल आकाश, अधूनमधून रिम झिमणारा पाऊस वैशाखातल्या कडंक उन्हाकडून जेष्ठातील हिरवाईकडे चाललेल्या निसर्ग आणि त्यातूनच आलेली वा-याची झुळूक बातमी घेऊन आली.

" चिन्तनीया हि विपदाम आदो एव प्रतिक्रिया
नकुपखननम युक्तम प्रदीप्ते वन्हिना गृहे "

## अर्थ

आपत्ती येण्यापूर्वीच उपायोजनेचा विचार करून ठेवला पाहिजे घर आगीने पेटल्यावर मग विहीर खणणे योग्य नाही.

या उपदेशातील मूळ तत्वावर आपण चिंतन केले तर आपलया जीवनातील अनेक लहान - मोठया समस्या आपण टाळू शकू.

दि. १५ जूनची रात्र उत्तरखंडात गंगोत्री आणि जमुनोत्री येथे झालेली ढग फुटी त्या प्रलयातून झालेली महाभयानक हानी. हया सर्वांवर विविध पातळीवर चर्चा सुरु आहे. हे मानव निर्मित की, निसर्ग निर्मित. काही दिवसांपूर्वी पुण येथे कात्रज तर काही वर्षांपूर्वी जूलै महिन्यात मुंबई सह संपूर्ण महाराष्ट्रात प्रलयंकारी पुराने हाहा:कार उडवून दिला. २६ डिसेंबर २००४ मध्ये प्रथमच सुनामी! प्रथमच ऐकिवात आलेला शब्द. हा विध्वंसक शब्द प्रत्येकाच्या मन:पटलावर कोरला गेला. हया सर्वांमधून आपण सावध होवून कधीपूर्व नियोजन करणार? Prevention is better than cure अशी एक म्हण आहे. किरकोळ आजारासाठी सुधा आपण आपल्या घरात अनेक औषधी बाळगतो.

सुनामी, प्रलय हया सर्वांची आठवण झाली की अंगावर सरसरून शहारे येतात. वर्षानुवर्ष शांत असणारा व स्वत!ची मर्यादा न विसणारा समुद्र त्या दिवशी रौद्ररूप धारण करता झाला. का? भरून आनंद, समाधान, सुख व शांती देणारी निसर्ग निर्मीत श्रध्दा स्थान प्रलयात नष्ट झाली. एका क्षणात होत्याचे नव्हते झाले. लाखो जीवित व वित्तहानी झाली. का? हा एक गहन प्रश्न आहे. मनुष्य व निसर्ग एकमेकांचे पूरकतत्व व सोबती आहेत. अधिक जमीन हवी म्हणून वृक्षतोड व समुद्रात भर टाकून नव्या इमारती उभ्या होऊ लागल्या. मनुष्याच्या हावेपायी हळूहळू पर्यावरणात बदल होऊ लागला. कधी अतिवृष्टी तर कधी अतिशय तीव्र उन्हाळा, अशा बदलत्या हवामानाने माणसास भंडावून सोडले आहे.

मानवाने संपूर्ण सृष्टीला आपल्या जीवनाचा एक अविभाज्य घटक म्हणून समजले पाहिजे. संत तुकाराम वृक्ष वल्लीला सगेसोयरे संबोधतात. मनुष्याच्या नीतिशास्त्रात सर्व चराचर सृष्टीचा विचार केलेला असला पाहिजे, मानवने

मनवापुरतेच जर पहिल तर तोही इतर पशुपक्ष्यांच्याच पायरीचा होईल. मानवेतर सृष्टीचे शक्य तितके प्रेमाने संगोपन करील, मानवेतर सृष्टीशीही जर जिव्हाळयाचे संबध जोडला तरच तो सर्व सृष्टीत श्रेष्ठ असे सिध्द होइल. सृष्टी चा संहार करतो म्हणून मोठे, असे म्हणवून घेण्यापेक्षा सर्व सृष्टीवर आपण प्रेम करतो म्हणून मोठे, असे म्हणवून घेण्यात मानवाचा खरा मोठेपणा आहे.

पशू,पक्षी,वृक्ष वनस्पती यांच्याशी असे जिव्हाळयाचे संबंध जोडण्याचा भारतीय संस्कृतीने प्रयत्न केला आहे. मानवी कुंटुबात त्यांना प्रेमाचे स्थान दिले आहे. मानवी शक्ती मर्यादित आहे. परंतू त्या मर्यादित शक्ती जे काही करता येईल ते मानवने करावे असे भारतीय संस्कृती सांगते.

निसर्गावर विजय मिळविण्याच्या नादात आपण आपल्या मर्यादा विसरलो. आता वेळीच शहाणे होणे गरजेचे आहे. माणसाने निर्माण केलेल्या स्वार्थी, भष्ट्राचारी दुनियेत माणूस व निसर्ग दोन्ही हरविलेले आहे. पर्यावरणाच स्वरूप जागतिक असून,त्याच आव्हान मात्र सामाजिक व राजकीय आहे. आपला समाज काळानुरूप सुसंस्कृत व जबाबदार होत नसल्यामुळे संपूर्ण पृथ्वी धोक्यात आहे.

हया पृथ्वीच्या धोक्याची चेतावणी अनेक पध्दतीने दिली जाते. जसे ‘ एज ऑफ स्टूपिड' या ॲनिमेषनपटात २०७५ साल असं दाखवलं आहे की, त्यात मानवी संस्कृतीच्या खुणा, कला व ज्ञान जतन करून ठेवण्याची जबाबदारी एका संग्राहकावर टाकली आहे. हा संग्राहक बर्फाच्छादन पूर्णपण्र नष्ट झालेल्या उत्तर धुवावर बसून चित्र फितीमधून भूतकाळातील मानवी वर्तन पाहत बसला आहे. तो वर्तमानातील वृत्त आणि भविष्यातील भीषणता यांच मिश्रण करून मानवी बेजबाबदारपणा अधोरेखित करत सारखा म्हणतो, “ आपल्यास पृथ्वी वाचवता आली असती की, ! “ संपूर्ण जगच मूर्खासारखं वागत होत हे दिग्दर्शक वारवार ठसवत राहतो. या व अशा कल्पनांना अस्तिवास्तव ( फॉटसी) संबोधून त्यांची उपेक्षा करता येत नाही. २१ व्या शतकात प्रवेश केल्यापासून येत असलेल्या नैसर्गिक व मानवी आपत्तीतर या कल्पनांपेक्षाही भयंकर आहेत. आपत्तींची तीव्रता आणि वारंवारिता क्रमाक्रमाने वाढत आहे. आताचा उत्तराखंडचा प्रलय हा त्या मालिकेतील एक.

अजूनही वेळ गेलेली नाही. माणसा जागा हो!माणसाने माणसास खाऊ नये आणि माणसास मारू नये. हा माणुसकीचा पहिला धडा आहे. आज माणूस माणसास प्रत्यक्ष खात नाही. पण भष्ट्रप्रवृतीने माणूस माणसास संपविण्याच्या मागे हात धून लागला आहे. हे सर्व वेळीच थांबावे सामान्यातील सामान्य माणूस, महिला, बालक हया सर्वांना समान वागणूक मिळावी निसर्गाला आपल्या स्वार्थासाठी वापरू नये, कोणत्याही सतेचा स्वार्थासाठी वापर होवू नये. हयासाठी केलेले हे विचार मंथन.“तेन त्यक्तेन भुज्जीथा!”

“अरे जगात दुस-याची झीज-भूक भरून काढ आणि मग तू स्वत:उपभोग घे.”

## संदर्भ

**साने गुरूजी, (२००६).** भारतीय संस्कृति, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजया नगर, पुणे - ४११०३० २१ वी आवृत्ती

**सद्‌गुरू श्री वामनराव पै. (२००४).** अमृत मंथन, प्रकाशन जीवन विद्या मिशन बोरीवली (पूर्व) मुंबई - ६६, प्रथम आवृत्ती - १९७९.